**DNS BANK**
**डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.**
(मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक)

**वसुली विभाग :** एव्हरेस्ट अॅनेक्स, द्वारका हॉटेलच्या वर, डोंबिवली रेल्वे स्टेशननजीक, डोंबिवली (प.), जि. ठाणे. **दू. क्र.** (०२५१) २४९४८५३ / २४८०६२६

# जाहीर लिलाव नोटीस (पुनर्लिलाव)

निम्नलिखित तक्त्यामधील उल्लेखित विविध कर्जदारांना दिलेल्या कर्जापोटी **डोंबिवली नागरी सहकारी बँक लिमिटेड (बँक)** यांच्याकडे गहाण असलेली खाली नमूद केलेल्या मालमत्ता सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (सरफैसी अॅक्ट) आणि त्याअंतर्गत बनविलेल्या नियमान्वये जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यात येणार आहे.

| अनु. क्र. | कर्जदाराचे नाव | येणे रक्कम रुपयांमध्ये | रक्कम या तारखेपर्यंत | पासूनचे पुढील व्याज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. दिलीप बंडोपंत पाटील आणि श्री. विजय बंडोपंत पाटील | ४४,६८,२००.८७ | ३०.०९.२०१७ | ०१.१०.२०१७ |
| २. | मे. मधुमती टेक्स्टाईल्स, (प्रोप्रा. श्री. यशवंत मधुकर होगाडे) | ५३,७३,८५३.०० | ३०.०९.२०१७ | ०१.१०.२०१७ |
| ३. | श्री. विनायक मधुकर होगाडे | ३४,४८,६१४.७५ | ३०.०९.२०१७ | ०१.१०.२०१७ |

उपरोल्लेखित तारखेपर्यंतच्या रकमेची परतफेड अधिक कंत्राटी दराने व्याज आणि शुल्क आणि कर्जाची परतफेड होईपर्यंतचे खर्च कर्जदाराने बँकेला करावे लागतील. बँकेकडे खाली नमूद सुरक्षित मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** आहे.

| अनु. क्र. | कर्जदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत (रु. लाखात) | इसारा अनामत रक्कम (इअर) (रु. लाखात) | तपासणीचा दिनांक व वेळ | लिलावाचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. दिलीप बंडोपंत पाटील आणि श्री. विजय बंडोपंत पाटील | संत मळा, नाईक पथ संस्था जवळ. इचलकरंजी, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथे स्थित आर.एस.नं. ४६९, हिस्सा नं. २/ए (भाग) क्षेत्र एच.आर. ०-२.८, वर असणाऱ्या प्लॉट नं. ३, जमीन मोजपाप २७८.८० चौ.मी म्हणजेच ३००० चौ.फु असणाऱ्या इमारतीसह निवासी उद्देशासाठी तळमजला आणि हाऊस क्र. १३/ ८४६ व्यावसायिक उद्देशासाठी लुम शेड असलेल्या बांधकामासहित सर्व खंड व तुकडे आणि चतुः सीमा खालीलप्रमाणे :-<br>पूर्वेला : दिनकर लाड यांची मालमत्ता<br>पश्चिमेला : श्री. बजाज यांची मालमत्ता<br>दक्षिणेला : २० फुट रुंद रस्ता<br>उत्तरेला : बंडगर यांची मालमत्ता | ३७.९२ | ३.७९ | १७.०१.२०२० सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वा. पर्यंत | ३०.०१.२०२० रोजी सकाळी १०.३० वा. |
| २ | मे. मधुमती टेक्स्टाईल्स, (प्रोप्रा. श्री. यशवंत मधुकर होगाडे) | जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले, तारदळ येथे स्थित हिस्सा क्र. बी सी. गट. क्र. ५६१, एकत्रित मोजमाप ५२०.०४ चौ. मी. म्हणजे ५६०० चौ. फूट अकृषीक जमिनीचे सर्व खंड व तुकडे आणि सीमा खालीलप्रमाणे :-<br>**पूर्व** : नाला<br>**पश्चिम** : वरद इम्पेक्स ची मालमत्ता<br>**दक्षिण** : २० फूट रुंदीचा रस्ता<br>**उत्तर** : सी. गट क्र. ५६१/बी ची मालमत्ता | २३.९१ | २.३९ | १८.०१.२०२० सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वा. पर्यंत | ३०.०१.२०२० रोजी सकाळी ११.०० वा. |
| ३ | श्री. विनायक मधुकर होगाडे | जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले, तारदळ येथे स्थित सी. गट. क्र. ६६६, प्लॉट क्र. ९ आणि एकत्रित मोजमाप ४७४.४४ चौ. मी. म्हणजे ५१०५ चौ. फूट अकृषीक जमिनीचे सर्व खंड व तुकडे आणि सीमा खालीलप्रमाणे :-<br>**पूर्व** : जागा क्र. १० ची मालमत्ता<br>**पश्चिम** : श्री. खामकर यांची मालमत्ता<br>**दक्षिण** : २० फूट रुंदीचा रस्ता<br>**उत्तर** : श्री. खामकर यांची मालमत्ता | १२.१७ | १.२० | १८.०१.२०२० सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वा. पर्यंत | ३०.०१.२०२० रोजी सकाळी ११.३० वा. |
| लिलावाचे ठिकाण | **डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.**, वसुली विभाग, ६७/बी, १८/४८५, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी जिल्हा-कोल्हापूर-४१६ ११५. दू. क्र. ०२३०-२४३८२५४. | | | | | |

**अटी आणि शर्ती :**

१. विक्रीकरिताचे बोली अर्ज आणि अटी व शर्ती, ६७/ब, १८/४८५ शाहु पुतळ्याजवळ, इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर-४१६ ११५ येथे स्थित आमच्या वसुली विभागात कामकाजाच्या कोणत्याही दिवशी **स. १०.०० आणि सायं. ४.००** या वेळेत प्रत्येक बोलीसाठी रक्कम **रु. १,०००/- (ना परतावा)** भरून प्राप्त करता येतील.

२. बोलीदाराने लिलावाच्या दिवशी बोलीकरिता स्वतः भाग घ्यावयास हवा आणि बोली, मोहोरबंद पाकिटामध्ये उपरोल्लेखित इसारा अनामत रक्कम आरटीजीएस/एनईएफटी द्वारे किंवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत किंवा शेड्यूल्ड बँकेचा कोल्हापूर येथे देय **"डोंबिवली नागरी सहकारी बँक लि."**च्या नावे पे ऑर्डर / डिमाण्ड ड्राफ्टसह, **दि. २९.०१.२०२०** रोजी **सायं. ०५.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी **उपरोल्लेखित पत्त्यावर प्राधिकृत अधिकारी, डोंबिवली नागरी सहकारी बँक लि., इचलकरंजी** येथे पोचावयास हव्यात. इसारा अनामत रक्कमेशिवाय आणि/किंवा राखीव किंमतीपेक्षा कमी असलेल्या बोली स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलींचे मोहोरबंद लिफाफे लिलावाच्या वेळी उपरोल्लेखित ठिकाणी उघडण्यात येतील.

३. बोलीदाराच्या वतीने बोली प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने त्याच्या/तिच्या नावे अधिकृत पत्र/संचालक मंडळाचा ठराव सादर करणे आवश्यक आहे.

४. बोलीदाराने एक पासपोर्ट आकाराचा फोटो आणि निवासाचा पुराव्यासह जसे पॅन कार्ड/आधार कार्ड यासारख्या केवायसी कागदपत्रांची स्वयं साक्षांकित प्रती लिलावाच्या वेळी जमा करावी. सोबत मूळ प्रत पडताळणीसाठी आणावी.

५. मालमत्तेची विक्री काटेकोरपणे **"जशी आहे जेथे आहे तत्त्वावर आणि जशी आहे जी आहे तत्त्वावर"** करण्यात येईल आणि इच्छुक बोलीदारांनी मालमत्तेविरुद्ध असलेला कोणताही दावा, देय प्रभार, कर, देणी आणि / किंवा इतर कोणतीही दायित्व, याबाबतची स्वतंत्रपणे चौकशी करावी. जर तशी काही देणी असल्यास बोलीदाराने त्यांचे दायित्व स्वीकारायचे आहे. सदर मालमत्तेवर आत्ता एखादी देणी असल्यास त्याबाबत बँकेस काहीही माहिती नाही.

६. लिलाव प्रक्रियेमध्ये प्राधिकृत अधिकाऱ्याने प्राप्त केलेल्या उच्चतम बोली रकमेपासून बोली पुढे सुरू होईल आणि त्यानंतर बोलीदारांना वर नमूद केल्याप्रमाणे त्यांची बोली मालमत्ता क्र. १, २ आणि ३ च्या संबंधित किमान अनुक्रमे रु. ३०,०००/-, रु. २५,०००/- आणि रु. १०,०००/- ने वाढविण्यास परवानगी देण्यात येईल.

७. यशस्वी बोलीदाराने ठरलेल्या खरेदी रकमेच्या **२५%** रक्कम (अगोदर भरलेली इसारा अनामत रक्कम समाविष्ट) त्यांची बोली स्वीकारण्यात आल्यानंतर लगेचच म्हणजेच त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवशी **सायं. ५.००** वाजेपर्यंत भरावी आणि उर्वरित रक्कम विक्रीची निश्चिती झाल्याच्या दिवसापासून **१५ दिवसांच्या** आत भरावी.

८. जर यशस्वी बोलीदार कलम (७) मध्ये नमूद केल्यानुसार बोली रकमेच्या **२५%** रक्कम भरणा करण्यास अयशस्वी ठरल्यास, त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त केली जाईल आणि विक्री रद्द झाली असे समजले जाईल. तसेच, जर बोलीदार उर्वरित शिल्लक ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत भरणा न करू शकल्यास त्याने भरलेली **२५%** रक्कम जप्त केली जाईल.

९. विक्री निश्चित झाल्यावर आणि कलम (७) मध्ये नमूद केल्यानुसार संपूर्ण बोली रक्कम भरण्याच्या शर्तींची पूर्तता झाल्यानंतर, प्राधिकृत अधिकारी यशस्वी बोलीदारास सिक्युरिटी इन्टरेस्ट (एनफोर्समेन्ट) रूल्स २००२ नुसार विक्री प्रमाणपत्र प्रदान करेल आणि विक्री प्रमाणपत्र यशस्वी बोलीदाराच्या नावे नोंदणीकृत होण्याकरिता स्टॅम्प ड्युटीसह सर्व कर **(१ % टी. डी. एस. सह)**, नोंदणीकरण शुल्क आणि प्रासंगिक खर्च यशस्वी बोलीधाराने धारण करणे आवश्यक आहे. प्राधिकृत अधिकारी संपूर्ण बोली रक्कम प्राप्त झाल्यानंतरच सदर मालमत्तेचा ताबा यशस्वी बोलीदारास हस्तांतरीत करतील.

१०. प्राधिकृत अधिकाऱ्यांना कोणतेही कारण न देता आणि पूर्व सूचनेशिवाय लिलाव रद्द करणे/पुढे ढकलणे अथवा कोणतीही बोली स्वीकारणे वा नाकारण्याचा आणि विक्रीच्या कोणत्याही अटी आणि शर्तीमध्ये सुधारणा करण्याचा सर्वाधिकार राहील.

११. लिलावाबाबतच्या अधिक माहितीसाठी बँकेच्या प्राधिकृत अधिकारी यांचेशी पुढील **दूरध्वनी क्र.** (०२३०) २४३८२५४ **मोबा. नं.: ९८७०९९५६२५ / ९४२३३६७४८७ वर** संपर्क साधता येईल.

ठिकाण : **इचलकरंजी**
दिनांक : **१०.०१.२०२०.**

*** उपरोल्लेखित मराठी मजकुरामध्ये काही संदिग्धता असल्यास / आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा.**

स्वाक्षरी/-
**प्राधिकृत अधिकारी**